Please Consider the Environment Before Printing…

**Date: 08/05/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## मुक्तछंदाचे प्रवर्तक कवी अनिल

प्रसिद्ध कवी आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ अनिल यांचे मराठी कवितेच्या वाटचालीप्रमाणेच अपारंपरिक शिक्षणक्षेत्रातही भरीव योगदान आहे. त्यांचा जन्म ११ सप्टेंबर १९०१ रोजी विदर्भातील मूर्तिजापूर येथे झाला. अनिल यांनी मॅट्रिकची परीक्षा अलाहाबाद येथून उत्तीर्ण केली होती. ते तत्त्वज्ञान हा विषय घेऊन पुण्याहून बीए (१९२४) झाले. पुढे, ते १९२५ साली एलएलबी झाले आणि त्यांनी अमरावतीला वकिली सुरू केली. त्यातूनच त्यांना होशंगाबाद (मध्य प्रदेश) येथे न्यायाधीश म्हणून नियुक्ती मिळाली. अनिल यांच्या आवडीचे विषय पुरातत्त्व, शिल्प, संगीत आणि तत्त्वज्ञान हे होते. अनिल यांच्या काव्यलेखनास १९३० साली प्रारंभ झाला. त्यांचा 'फुलवात' हा पहिला कवितासंग्रह १९३२ साली प्रसिद्ध झाला. 'फुलवात'ने मराठी साहित्यविश्वाचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या कवितेमध्ये पांडित्यपूर्ण, संस्कृतप्रचुर शब्दकळा, प्रसंगोपातता, शब्दालंकार, यमकादी बंधने यांवर कठोर कटाक्ष असे. त्यांना मुक्तछदांचे प्रवर्तक मानले जाते.

त्या पार्श्वभूमीवर अनिल यांचा 'फुलवात' हा संग्रह 'हृदयी लावियली फुलवात' अशा हळुवार ओळी घेऊन बाहेर आला. त्या कवितेचे वेगळेपण आणि वैशिष्ठ्य साधी, सरळ व भावस्पर्शी रचना आणि उत्कट गीतात्मता हे ठरले. त्यानंतर तीन वर्षांनी अनिल यांची 'प्रेम आणि जीवन' ही कविता रसिकांपुढे आली. अनिल यांनी मालवण येथे झालेल्या 'मराठी साहित्य संमेलना'चे अध्यक्षपद १९५८ साली भूषवले होते. त्यांनी कवितेत रचनेच्या अंगानेही प्रयोग केले. ते 'दशपदी' आणि 'मुक्तछंद' या काव्यप्रकारांचे प्रवर्तक होते. त्यांना 'दशपदी'साठी 'साहित्य अकादमी' पुरस्कार १९७७ साली मिळाला होता. अनिल यांना १९७९ ची 'साहित्य अकादमी'ची फेलोशिप प्रदान करण्यात आली होती. अनिल आणि कुसुमावती या सुविद्य दाम्पत्याच्या पत्रव्यवहाराचा संग्रह (कुसुमानिल) प्रसिद्ध आहे. अशा या महान कवीचे ८ मे १९८२ रोजी निधन झाले.

Nashik Edition

May 08, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401